# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/५९
Telephone No. : 020-25621156/57/59
ईमेल/ Email : approval@unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
संकेतस्थळ/ Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र : सीसीओ/४५२४

दिनांक :२८/०७/२०२६

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालये

विषय:– तासिका तत्वावरील अध्यापकांच्या संस्था/महाविद्यालय स्तरावरील नियुक्तीस विहित वेळेत मान्यता देणेबाबत...

संदर्भ:– मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/तासिका/परिपत्रक/मवि–१/२०२६/ई– दि. २७/०७/२०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्था/महाविद्यालय स्तरावर शैक्षणिक कामकाज सुरळीत पार पाडता यावे यासाठी तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्या करण्यात येतात. तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्या विहित पध्दतीचा अवलंब करून मान्यतेसाठी विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक असते. बऱ्याचदा संस्था/महाविद्यालयांकडून विहित पध्दतीचा अवलंब न करता अपुरे व अस्पष्ट प्रस्ताव विद्यापीठाकडे मान्यतेसाठी सादर केले जातात. त्यामुळे असे प्रस्ताव विद्यापीठाकडे प्रलंबित राहतात, त्यामुळे तासिका तत्वावरील अध्यापकांना मान्यता देण्याबाबत कार्यवाही वेळेत पूर्ण होऊ शकत नाही.

सबब, सर्व अनुदानित संस्था/महाविद्यालय यांना या पत्रान्वये सुचित करण्यात येते की, तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्या शासन निर्णयानुसार विहित पध्दतीचा अवलंब करून दि. ३१ जुलै, २०२६ पर्यंत विद्यापीठाकडे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावेत. विहित कालावधीत शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव सादर न केल्याने किंवा अध्यापकास मान्यता न मिळाल्याने त्यांच्या मानधनाचा प्रश्न निर्माण झाल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्था/महाविद्यालय यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

28/7/2026

(स. द. डाबखर)
उपकुलसचिव (अतिरिक्त कार्यभार)

सोबत:– मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांचे पत्र

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र. उशिसं/तासिका /परिपत्रक/मवि-१/२०२६/ई- दि.२७.७.२०२६

प्रति,

1. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)
2. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

विषयः तासिका तत्वावरील अध्यापकांच्या संस्था/महाविद्यालय स्तरावरील नियुक्तीस विहित वेळेत मान्यता देण्याबाबत.

संदर्भः 1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-2021/प्र.क्र.181/21/विशि-1 दि. 17.10.2022

2. या संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/2025/सीएचबी/मवि-1/ E-Comp. No.: 2116448 दि. 09.10.2025

उपरोक्त विषयाबाबत, शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पहिल्या दिवसापासून तासिका तत्वावरील अध्यापकांच्या सेवा उपलब्ध होऊन शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे पार पाडता यावे, याकरिता तासिका तत्वावरील अध्यापकांची प्रत्येक वर्षी नियुक्ती करण्यासंदर्भात शासन निर्णय दि. 17.10.2022 अन्वये कार्यपद्धती व कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार, तासिका तत्वावरील अध्यापकांच्या संस्था/महाविद्यालय स्तरावरील नियुक्त्या या विहित कालबद्ध कार्यक्रमानुसारच करण्यात याव्यात. तथापि, बऱ्याचदा विद्यापीठांच्या स्तरावर तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीस मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव प्रलंबित राहतात, ज्यामुळे त्यांना वेळेवर मानधन अदा करण्यात अडचणी निर्माण होतात.

यास्तव, सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे आणि विभागीय सहसंचालक कार्यालये यांना सूचित करण्यात येते की, संस्था/महाविद्यालय स्तरावर तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्या संदर्भीय शासन निर्णयानुसार काटेकोरपणे कालबद्ध कार्यक्रमानुसार कराव्यात. तसेच, या सर्व नियुक्त्यांना विद्यापीठांनी कोणत्याही परिस्थितीत दि. 31 जुलै 2026 पर्यंत मान्यता द्यावी.

सदर मुदतीनंतर कोणतेही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. विहित वेळेत कार्यवाही न झाल्यास व त्यामुळे अध्यापकांच्या मानधनाचा प्रश्न निर्माण झाल्यास, याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठ व महाविद्यालयांची राहील, याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 27-07-2026 17:02:31

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-16

प्रत- माहितीस्तव सादर

1. मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव
2. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-32